Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/शा.टे./वि.प.प्र/ 1786 दि. 13 AUG 2024

# -: परिपत्रक :-

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय:-** विनाअनुदानीत तत्वावर व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या विविध प्रस्तावातील नोंदणी शुल्क आकारणे व शासनाच्या खात्यात जमा करणे.

**संदर्भ:-** १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णक क्र. सीईटी २३२४ / प्र.क्र. १२७ / मशि-२, दि. १५/०७/२०२४ चे पत्र.
२) उच्च शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे. क्र. बीबीए-३४२४ / प्र.क्र. ३८ (ई-६५३०९१) / सीईटीसेल दिनांक १८/०७/२०२४ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित तत्वावरील व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्था सुरू करणे, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, मंजुर प्रवेश क्षमतेत बदत करणे, महिला संस्थांचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन करणे इत्यादी बाबींसाठी शासन निर्णय दि. १५/०७/२०२४ अन्वये निश्चित केलेल्या शुल्काचा भरणा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे करण्यासाठी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) महाविद्यालयाने प्रत्येक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्रपणे शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.
(उदा. एका महाविद्यालयात बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस., बी.एड., एम.एड. इत्यादी असे अभ्यासक्रम नव्याने सुरू होणार आहेत, त्यावेळी उक्त प्रत्येक अभ्यासक्रमांसाठी शुल्काचा भरणा करावा.
तथापि, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत बी.सी.ए. अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त आहे, पण महाविद्यालयाने बी.सी.ए. मधील एकापेक्षा अधिक बी.सी.ए.(आयबी), बी.सी.ए.(सीए), इ. अशा अनेक अभ्यासक्रमांची नोंदणी केलेली आहे. या वेळी महाविद्यालयाने केवळ बी.सी.ए. या अभ्यासक्रमासाठी एक वेळाच शुल्क भरणा करावा.)

२) नोंदणी शुल्काचा भरणा धनाकर्षाव्दारे (Demand Draft) करणे आवश्यक असून, सदरचा धनाकर्ष SBI A/C GRAS या नावाने (Payable at Pune) काढावा.

३) सदरहू धनाकर्षाच्या (Demand Draft) पाठीमागील बाजूस महाविद्यालयाचे नाव, पत्ता, अभ्यासक्रमाचे नाव व संपर्क क्रमांक लिहावा.

४) सदरहू धनाकर्ष (Demand Draft) दिनांक २४.०७.२०२४ पर्यंत उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ४१२-ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६ या कार्यालयात हस्तपोच जमा करावा.

५) यापुर्वी तंत्र शिक्षण संचालनालयाकडे / तंत्र शिक्षण संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडे उक्त अभ्यासक्रमांसाठी (DTE) नोंदणी शुल्क भरले असल्यास, त्यांनी पुन्हा नोंदणी शुल्क भरण्याची आवश्यकता नाही, तथापि, सदरहू शुल्क भरणा केल्याबाबतची पोहोच पावती (Receipt) ऑनलाईन अपलोड केलेली असणे आवश्यक आहे.

**तेंव्हा उपरोक्त मुद्यानुसार महाविद्यालयांनी कार्यवाही करावी, ही विनंती.**
कळावे.

आपला विश्वासू,

डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत:- शासन पत्रे जोडली आहेत.

E:\Aditya\Parit Sir\Shashan Table (Parit Sir).docx

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - १६
Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

क्र. बीबीए-३४२४/प्र.क्र. ३८(ई-६५३०९१)/सीईटीसेल/ दिनांक : १८/०७/२०२४

वाचा : उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.सीईटी २३२४/प्र.क्र.१२७/मशि-२, दि. १५/०७/२०२४.

**परिपत्रक -**

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित तत्वावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था सुरू करणे, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करणे, महिला संस्थांचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन करणे तसेच या उलट परिवर्तन करणे इ. बाबींसाठी शासन निर्णय दि. १५/०७/२०२४ अन्वये निश्चित केलेल्या शुल्काचा भरणा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे करणेसाठी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. महाविद्यालयाने प्रत्येक अभ्यासक्रमासाठी स्वंतत्रपणे शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.
(उदा. एका महाविद्यालयात बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस., बी.एड., एम.एड. इ. असे अभ्यासक्रम नव्याने सुरू होणार आहेत, त्यावेळी उक्त प्रत्येक अभ्यासक्रमांसाठी शुल्कांचा भरणा करावा.
तथापि, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत, बी.सी.ए. अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त आहे, पण महाविद्यालयाने बी.सी.ए. मधील एकापेक्षा अधिक बी.सी.ए.(आयबी), बी.सी.ए.(सीए), इ.अशा अनेक अभ्यासक्रमांची नोंदणी केलेली आहे. या वेळी महाविद्यालयाने केवळ बी.सी.ए. या अभ्यासक्रमासाठी एक वेळाच शुल्क भरणा करावा.)

२. नोंदणी शुल्काचा भरणा धनाकर्षाद्वारे (Demand Draft) करणे आवश्यक असून, सदरचा धनाकर्ष "SBI A/C GRAS" या नावाने (Payable at Pune) काढावा.

३. सदरहू धनाकर्षाच्या (Demand Draft) पाठीमागील बाजूस महाविद्यालयाचे नाव, पत्ता, अभ्यासक्रमाचे नाव व संपर्क क्रमांक लिहावा.

४. सदरहू धनाकर्ष (Demand Draft) दिनांक २४.०७.२०२४ पर्यत उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ४१२-ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६ या कार्यालयात हस्तपोच जमा करावा.

कृ.मा.प....

५. यापुर्वी तंत्र शिक्षण संचालनालयाकडे / तंत्र शिक्षण संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडे उक्त अभ्यासक्रमांसाठी (DTE) नोंदणी शुल्क भरले असल्यास, त्यांनी पुन्हा नोंदणी शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तथापि, सदरहू शुल्क भरणा केल्याबाबतची पोहोच पावती (Receipt) ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड केलेली असणे आवश्यक आहे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 18-07-2024 18:00:59

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति-

१. कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
   २/- सदरचे परिपत्रक हे आपल्या विद्यापीठाशी संलग्नित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व महाविद्यालयांना पाठविण्यात यावे.
२. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, फोर्ट, मुंबई - ०१.

विनाअनुदानित तत्वावरील व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या विविध प्रस्तावांकरीता नोंदणी शुल्क आकारणे व शासनाच्या खात्यात जमा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सीईटी २३२४/प्र.क्र.१२७/मशि-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ जुलै, २०२४

**वाचा :-**

संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. बीबीए-५०२४/प्र.क्र.३५/सीईटीसेल/३४७४ दि. २९.६.२०२४

**प्रस्तावना :**

राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित तत्वावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था सुरु करणे, नविन अभ्यासक्रम सुरु करणे, मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करणे, महिला संस्थाचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन करणे तसेच या उलट परिवर्तन करणे इ. बाबींसाठी नोंदणी शुल्क आकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

सन २०२४-२५ या वर्षापासून विनाअनुदानित तत्वावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था सुरु करणे, नविन अभ्यासक्रम सुरु करणे, मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करणे, महिला संस्थाचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन करणे तसेच या उलट परिवर्तन करणे इ. बाबींसाठी खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे नोंदणी शुल्क आकारण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहे / सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई , ठाणे, नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्र | पुणे, नागपूर छत्रपती संभाजीनगर, पिंपिरी-चिंचवड महानगर पालिक क्षेत्र | उर्वरित महानगर पालिक क्षेत्र | इतर |
| १ | नवीन बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस पदवी अभ्यसक्रमांची नवीन महाविद्यालये | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| २ | नवीन शिक्षणशास्त्र शारीरिक शिक्षण पदवी अभ्यासक्रमांची महाविद्यालये | ६०,०००/- | ४०,०००/- | ३०,०००/- | २०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | नवीन शिक्षणशास्त्र शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची महाविद्यालय | ६०,०००/- | ४०,०००/- | ३०,०००/- | २०,०००/- |
| ४. | नवीन विधी पदवी अभ्यासक्रांची महाविद्यालये | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| ५. | सुरु असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये तथा संस्थेत अतिरिक्त / नवीन अभ्यसक्रम सुरु करणे व अभ्यासक्रमांच्या मंजूर प्रवेश क्षमतेत वाढ करणे अथवा प्रवेश क्षमता कमी करणे. | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| ६ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे तथा संस्थांचे स्थलांतरण | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ७ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये बंद करणे | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ८ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालयातील अभ्यासक्रम बंद करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| ९ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या नावात बदल करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १० | महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |

२. सदर नोंदणी शुल्क संचालक, उच्च शिक्षण यांनी आकारुन शासनखाती जमा करण्याची कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०७१५१२१८३९३२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

HEMANT S PATHAK

Digitally signed by HEMANT S PATHAK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=1a5892 4bb1ebc2ed6699e048bfa42ad41d1ed32de1e3eda84d0c03040473905e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EE0347853A43CF2A3547CBC186E49802A70EF183CF48807 3EB1785E6AD171A6, cn=HEMANT S PATHAK
Date: 2024.07.15 12:30:39 +05'30'

**(हे. सु. पाठक)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. उपमुख्यमंत्री (१) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उपमुख्यमंत्री (२) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई.
८. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
१०. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-II मुंबई / नागपूर.
१३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
१६. कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई
१७. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
१८. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
१९. कुलसचिव, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२०. कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
२१. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२२. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
२३. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
२४. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
२५. कुलसचिव ,गोंडवाना विद्यापीठ.गडचिरोली ,
२६. निवडनस्ती, मशि-२